**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. समीरपाशा सरदारपाशा पाटील
रा. आलास, ता.शिरोळ, जि. कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था,शिरोळ, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा चेअरमन/सेक्रेटरी,
कै. आलमखान पठाण कृष्णा सहकारी पाणी पुरवठा
सहकारी संस्था मर्या., आलस, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६०१ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २४.६.२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था,शिरोळ, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर श्री. बी. एस. कट्टे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १.९.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २९.९.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. -- |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १०.११.२००८ |

८ माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र -क) प्रत सोबत जोडली आहे.

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२९.५.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश करण्यात आला होता. त्यावेळी अपीलकर्ता गैरहजर असल्याने दि. २४.६.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली. सुनावणीलाही अपीलकर्ता गैरहजर होते.

अपीलकर्ता श्री. समीरपाशा स. पाटील यांनी मागितलेली माहिती कै. आलमखान पठाण कृष्णा सहकारी पाणी पुरवठा सहकारी संस्था मर्या., आलस, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर या संस्थेने न दिल्याने त्यांनी अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, शिरोळ यांच्याकडे अपील केले. अपिलीय प्राधिकारी यांनी माहिती संस्था स्तरावरील असल्याचे नमूद करुन अर्ज जन माहिती अधिकारी तथा चेअरमन/सेक्रेटरी यांच्याकडे / संस्थेकडे वर्ग केला. संस्थेला प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरीत्या शासनाचे कोणतेही शासकीय अनुदान मिळत नाही. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही, असे संस्थेने श्री. पाटील यांना कळविले. तशा आशयाचे लेखी निवेदन संस्थेचे सचीव श्री. बी. एस. कट्टे यांनी आयोगाला सादर केले. संस्थेचे म्हणणे रास्त आहे, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, शिरोळ, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर श्री. बी. एस. कट्टे यांनी केले. ते लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २८.१०.२००९

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. बाळासो मिरासो पटेल
जामदार प्लॉट नं.२, दुसरी गल्ली, निपाणी,
ता. चिकोडी, जि. बेळगाव

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उप आयुक्त,
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपशहर अभियंता,
वि.का.क्र.३, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६०९/ कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२४.६.२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उप आयुक्त,
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर

**जन माहिती अधिकारी** तथा उपशहर अभियंता,
वि.का.क्र.३, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २७.१०.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १५.९.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २९.१२.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १३.१.२००९ |

८ माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र -अ) प्रत सोबत जोडली आहे.

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. ४.४.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता गैरहजर असल्याने दि. २४.६.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली. सुनावणीस अपीलकर्ता गैरहजर होते.

अपीलकर्ता श्री. बाळासाो मिरासाो पटेल यांच्या अर्जावर जन माहिती अधिकारी तथा उपशहर अभियंता, वि.का.क्र.३, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर यांनी विहित मुदतीत माहिती दिली. अपीलकर्ता हे पूर्वी संबंधित डॉक्टरांकडे कामाला होते. त्यांच्याविरूध्द अन्य विभागाकडेही श्री. पटेल यांनी याच स्वरुपाचे अर्ज केले असून संबंधित जागेतील व्यवसाय अनधिकृत असून डॉक्टरांवर कारवाई व्हावी, अशी श्री. पटेल यांची मागणी आहे. त्या संदर्भातही सर्व माहिती त्यांना देण्यात आली आहे, असे जन माहिती अधिकारी तथा उपशहर अभियंता, वि.का.क्र.३, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्री. आर.के. पाटील व अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्री. गणेश एन. देशमुख यांनी पूरक कागदपत्रांसह नमूद केले. ते लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२९.१०.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.अजय पांडुरंग पाटील
३०२, केदारनाथ हौसिंग सोसायटी, काविळतळी, ता.चिपळूण, जि.रत्नागिरी अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपसंचालक,
आरोग्य सेवा, ३ रा मजला, नवीन प्रशासकीय इमारत, पुणे-१ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा माहिती अधिकारी,
उपसंचालक आरोग्य सेवा यांचे कार्यालय, ३ रा मजला, नवीन प्रशासकीय इमारत, पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६०९ / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२७.१०.२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपसंचालक,
आरोग्य सेवा, ३ रा मजला, नवीन प्रशासकीय इमारत, पुणे-१ डॉ.उध्दव एच.गावंडे

**जन माहिती अधिकारी** तथा माहिती अधिकारी, उपसंचालक आरोग्य सेवा यांचे कार्यालय,
३ रा मजला, नवीन प्रशासकीय इमारत, पुणे-१ श्री.एस.ई.कांडेकर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३१.३.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २९.४.२००९ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २१.५.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>आपले कार्यालयातील वर्ग-४ च्या भरतीच्या दि.२३.१०.२००८ दै.प्रभात, पुण्यनगरीमधील जाहिरातीनुसार सदर भरतीकरिता एकूण किती अर्ज प्राप्त झाले व आपले कार्यालयाकडून एकूण किती उमेदवारांना लेखी परीक्षेस पात्र ठरविण्यात आले, निवड झालेल्या उमेदवारांच्या उत्तरपत्रिकांच्या छायांकित प्रती इ. भरतीच्या अनुषंगिक एकूण ५ मुद्दे. | |

## विवेचन

उपसंचालक, आरोग्य सेवा, पुणे-१ या कार्यालयातील वर्ग-४ च्या कर्मचाऱ्यांच्य भरतीच्या संदर्भातील माहिती अपूर्ण दिली. नियुक्ती देण्यात आलेल्या उमेदवारांच्या लेखी परीक्षेच्या उत्तरपत्रिकांच्या छायांकित प्रती दिल्या नाहीत. 'भरती प्रक्रिया ही स्पर्धात्मक असल्यामुळे लेखी पेपरच्या छायांकित प्रती देता येणार नाहीत,' असे जन माहिती अधिकारी तथा माहिती अधिकारी, उपसंचालक, आरोग्य सेवा यांचे कार्यालय, तिसरा माळा, नवीन प्रशासकीय इमारत, पुणे यांनी कळविले. या परीक्षेतील उमेदवारांचे पेपर संबंधित कार्यालयातील कर्मचाऱ्यानी स्वतः लिहिले आहेत. त्याबाबत भ्रष्टाचार झाल्याचे वृत्तपत्रांमध्ये विस्ताराने प्रसिध्द झाले आहे. म्हणून या उत्तरपत्रिका उपलब्ध होणे महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.अजय पांडुरंग पाटील यांनी लेखी निवेदनाद्वारे केले आहे.

श्री.पाटील यांनी प्रथम मागितलेल्या माहितीचे शुल्क तीस हजार रूपयांच्या जवळपास होत होते. ते कळविले. त्यानंतर त्यांनी वेगळ्या अर्जाद्वारे माहितीची मागणी केली. त्याचे शुल्क रु.२०२२/- कळविल्यानंतर त्यांनी भरले. पात्र उमेदवारांच्या उत्तरपत्रिका वगळता सर्व माहिती त्यांना दिली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा माहिती अधिकारी, उपसंचालक, आरोग्य सेवा यांचे कार्यालय, तिसरा माळा, नवीन प्रशासकीय इमारत, पुणे श्री.एस.ई.कांडेकर यांनी केले.

प्रथम अपिलाच्या सुनावणीस अपीलकर्ता गैरहजर राहिल्यामुळे तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा उपसंचालक, उपसंचालक आरोग्य सेवा यांचे कार्यालय, तिसरा माळा, नवीन प्रशासकीय इमारत, पुणे डॉ.वाय.एच.डोईफोडे यांनी अपील निकाली काढले, असे विद्यमान अपिलीय प्राधिकारी तथा उपसंचालक, उपसंचालक आरोग्य सेवा यांचे कार्यालय, तिसरा माळा, नवीन प्रशासकीय इमारत, पुणे श्री.उध्दव एच.गावंडे यांनी सांगितले.

परीक्षेची व भरतीची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. आता उत्तरपत्रिका देण्यात काय अडचण आहे, अशी विचारणा आयोगाने केली. त्यावर, 'उत्तरपत्रिका उपलब्ध असून देण्यात अडचण नाही,' असे निवेदन श्री.कांडेकर व डॉ.गावंडे यांनी केले.

संबंधित भरती ही शासकीय सेवेतील असून परीक्षेची व भरतीची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. सार्वजनिक सेवेसाठी करावयाच्या भरतीची प्रक्रिया पारदर्शक असणे आवश्यक आहे. सार्वजनिक कारभारातील पारदर्शकता हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील एक मुलभूत भाग आहे. भरती प्रक्रियेच्या बाबतीतही तो लागू आहे. त्यामुळे भरी प्रक्रिया स्पर्धात्मक असल्याच्या कारणावरून त्याबाबतची कोणतीही माहिती नाकारणे योग्य नाही. उलट, अशा स्वरूपाची प्रक्रिया अधिक पारदर्शक व संशयातीत आली पाहिजे. एवऐच नव्हे, तर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ४ नुसार पात्र उमेदवारांच्या निवडीबाबतची उत्तरपत्रिकांसह सर्व माहिती संबंधित खात्यांनी स्वतःहून सार्वजनिकरित्या उपाब्ध करून देणे आवश्यक आहे. एखाद्या नागरिकाने त्याची मागणी करण्याची वाट न पाहता संबंधित सार्वजनिक प्राधिकरणांनी शासकीय कारभाराबाबतचे उत्तरपत्रिकासह असे सर्व अभिलेख सवतः होऊन जाहीर केले पाहिजेत व ते जाहीर स्वरूपात कोणालाही कधीही उपलब्ध होऊ शकले पाहिजेत. हे लक्षात घेता, अपीलकर्ता श्री.अजय पांडुरंग पाटील यांच्या मागणीनुसार पात्र १०७ उमेदवारांच्या लेखी परीक्षेच्या उत्तरपत्रिकांच्या छायांकित प्रती दिल्या जाणे आवश्यक आहे. मात्र अन्वयार्थविष्यक मतभिन्नतेमुळे उत्तरपत्रिकांच्या प्रती जन माहिती अधिकाऱ्यांनी दिलेल्या नाहीत, हे विचारात घेता अपीलकर्त्याची

शास्ती व अन्य कारवाईची मागणी अमान्य करण्यात येत आहे. उत्तरपत्रिकांच्या प्रतींसाठी जन माहिती अधिकारी अपीलकर्त्यास योग्य ते शुल्क आकारू शकतात.

उभय बाजूंनी सादर केलेली निवेदने व कागदपत्रे पाहता आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

(२) उपसंचालक, उपसंचालक आरोग्य सेवा यांचे कार्यालय, तिसरा माळा, नवीन प्रशासकीय इमारत, पुणे कार्यालयातील सन २००८ मधील वर्ग-४ च्या भरती प्रक्रियेनुसार नियुक्त झालेल्या १०७ कर्मचाऱ्यांच्या लेखी परीक्षेतील उत्तरपत्रिकांच्या छायांकित प्रती अपीलकर्ता श्री.अजय पांडुरंग पाटील यांना योग्य ते शुल्क आकारून जन माहिती अधिकारी तथा माहिती अधिकारी, उपसंचालक आरोग्य सेवा यांचे कार्यालय, तिसरा माळा, नवीन प्रशासकीय इमारत, पुणे यांनी आठ दिवसांत द्याव्यात. दि.८.११.२००९ पर्यंत या कार्यवाहीची पूर्तता करून अनुपालन अहवाल सादर करण्याची जबाबदारी अपिलीय प्राधिकारी तथा उपसंचालक, उपसंचालक आरोग्य सेवा यांचे कार्यालय, तिसरा माळा, नवीन प्रशासकीय इमारत, पुणे डॉ.उध्दव एच.गावंडे यांची राहील.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ३० .१०.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१.

श्री. महमद इक्बाल महमद अब्दुल हसन पिरजादे
२७५, मुस्लिम पाच्छा पेठ, सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** विभाग नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
बुधवार पेठ, सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** आगार व्यवस्थापक,
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
बुधवार पेठ, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६११ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | १९.०६.२००८(वि.अ.नि.का.) |
| ३ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१६.०६.२००७ |
| ४ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२८.०६.२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१०.०८.२००७ |
| ६ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि.८.०९.२००७ |
| ७ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** डिसेंबर २००६, जानेवारी २००७ व फेबुवारी २००७ या महिन्यातील श्री. पिरजादे यांनी दिलेले वैद्यकिय रजेचे अर्ज (वैद्यकिय दाखल्यासह), दि. १३.१२.२००६ रोजीचा निलंबन आदेश स्वीकारल्याची पोच, पिरजादे यांचे निलंबन मागे घेतलेल्या आदेशाची प्रत, चौकशीस हजर न राहण्याबाबतच्या विनंती अर्जाची प्रत व आगार व्यवस्थापक, सोलापूर यांना असलेल्या बडतर्फीच्या अधिकाराबाबतचे डी अँड प्रोसीजर नियमाबाबतचे एकूण ११ मुद्दे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. १९.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश करण्यात आला होता. कार्यालयात उपलब्ध असणारी माहिती दिली असून उर्वरित माहिती एक महिन्यात देण्याबाबत उभय घटकांमध्ये एकमत झाले. तथापि माहिती एका महिन्यात प्राप्त न झाल्याची तक्रार

अपीलकर्ते श्री. महंमद पिरजादे यांनी दि.२५.०६.२००८ रोजी आयोगाकडे केली त्यावर आयोगाने दि.२७.०८.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा आगार व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, व अपिलीय प्राधिकारी तथा विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, सोलापूर यांच्याकडून खुलासा मागविला. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी दि. ६.१२.२००८ व १३.१२.२००८ रोजी पाठविलेल्या खुलाशावरून कार्यालयातील दोन्ही कर्मचारी लेखनिक सौ.एस.सी. गायकवाड व शिपाई श्री.एम.एम.नाईकवरे यांच्याकडून दि.२७.०१.२००९ रोजी खुलासा मागवून त्यावर अपिलीय प्राधिकारी यांना दि.२०.०८.२००९ रोजी चौकशीचे आदेश राज्य माहिती आयोगाने दिले. जन माहिती अधिकारी तथा आगार व्यवस्थापक, राज्य परिवहन महामंडळ, सोलापूर श्री.आय.एम.वन्यालोलू यांनी दि.३.०२.२००९ रोजी सादर केलेला खुलासा व पूरक कागदपत्रांवरून श्री. पिरजादे यांना दि.२५.०८.२००८ रोजी माहिती दिल्याचे आयोगास कळविले आहे.

कार्यालयात स्वीकारलेली पाकिटे वरिष्ठांना सादर न केल्याने सौ.एस.सी गायकवाड (लेखनिक) व श्री. एम.एम.नाईकनवरे (शिपाई) यांच्यावर प्रमादिया कारवाई राज्य मार्ग परिवहन महामंडळाने केली असल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, बुधवार पेठ, सोलापूर श्री. डी. बी.माने यांनी राज्य माहिती आयोगास अवगत केले आहे. सदरहू खुलासा मान्य करण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. ३१.१० .२००९

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१.

श्री. आनंदा दादू लोंढे
रा.भडकंबे, ता.वाळवा,
जिल्हा सांगली

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार,
तहसील कार्यालय, वाळवा,
ता.वाळवा, जिल्हा सांगली

**उत्तरवादी**

जन माहिती अधिकारी तथा गावकामगार तलाठी,
कोरेगाव, ता.वाळवा, जिल्हा सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६४२ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २३/६/२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
तहसील कार्यालय, वाळवा,
ता.वाळवा, जि.सांगली
श्री. संदेश शिर्के.

**जन माहिती अधिकारी** तथा गाव कामगार तलाठी,
भडकंबे, ता.वाळवा, जिल्हा सांगली
श्री. के.डी. महाजन

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २२/३/२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३१/३/२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २३/४/२००८ |
| ७ | प्रथम अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ९/६/२००८ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** मौजे भडकंबे, ता.वाळवा, येथील फेरफार क्र. ५१३६ ची नोंद करताना सहहिस्सेदारांना काढण्यात आलेल्या नोटिशींच्या प्रती, अशाप्रकारे महसूल कायद्याप्रमाणे नोटीस काढता येते का, याबाबत खुलासा, जिल्हाधिकारी, सांगली यांच्या आदेशाचे पालन केले किंवा नाही ?, सहहिस्सेदारांना नोटिसा न दिल्या गेल्या नसल्यास का दिल्या गेल्या नाहीत याबाबतचा खुलासा. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.आनंदा दादू लोंढे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलाचा दि. ११/११/२००८ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त समावेश होता. परंतु उभय घटकांत त्यावेळी एकमत न झाल्याने दि. २३/६/२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली. अपीलकर्त्यास सहायक जन माहिती अधिकाऱ्याने माहिती दिलेली असल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, वाळवा-इस्लामपूर यांनी लेखी निवेदनात नमूद केले आहे. तसेच अपीलकर्ता श्री.लोंढे यांचे दि. ६/२/२००९ रोजी निधन झाले असून त्यांचा मृत्यूदाखला तहसीलदार, वाळवा, जिल्हा सांगली यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास सादर केला.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.०७-११-२००९

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. महेशकुमार महादेव कांबळे
रा. म्हैसाळ वेस, पंचशीलनगर, मिरज,
जि. सांगली

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा आयुक्त,
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा वैद्यकीय आरोग्याधिकारी,
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६४३ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २३.६.२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा आयुक्त,
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली तर्फे
श्री. वाय. बी. माळी, अतिरिक्त आयुक्त

**जन माहिती अधिकारी** तथा वैद्यकीय आरोग्याधिकारी,
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली डॉ. राम हंकारे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३.४.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ९.५.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १७.५.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १९.६.२००८ |

८ **मुळ अर्जात मागणी केलेली माहिती**

सोबत छायांकित प्रत जोडली आहे.

## विवेचन

वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.राजेंद्र सुरवशी यांच्या संदर्भातील व आयुर्वेदिक औषधांच्या खरेदीबाबतची माहिती अपीलकर्ता श्री. महेशकुमार महादेव कांबळे यांनी जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय आरोग्याधिकारी, सांगली; मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली यांच्याकडे मागितली होती. या पदासाठी लागणाऱ्या शैक्षणिक पात्रतेसंबंधात चुकीची माहिती दिली व लस खरेदीबाबतची माहिती दिली नाही, या कारणावरुन श्री. कांबळे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

राज्य माहिती आयोगाने दि. ११.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश करण्यात आलेला होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.२३.६.२००८ रोजी अपिलाची सुनावणी घेण्यात आली.

श्री. कांबळे यांनी मागितलेली सन २००५ ते २००८ या कालावधीतील माहिती कार्यालयीन कर्मचाऱ्यांकडून संकलित करुन द्यावयाची होती. तसेच डॉ.राजेंद्र सुरवशी यांची पात्रता काय आहे, अशा स्वरुपाचे संदिग्ध प्रश्न होते. तरीही विहित मुदतीत त्यांना उत्तर देण्यात आले. माहिती संकलनासाठी लागलेल्या वेळामुळे ऊर्वरित माहिती देण्यास सहा दिवस विलंब झाला, त्यामुळे संबंधित कर्मचाऱ्याला नोटीस दिलेली आहे. डॉ.राजेंद्र सुरवशी यांची पात्रता काय आहे, या विचारणेतून श्री. कांबळे यांना अपेक्षित असलेली शैक्षणिक पात्रतेविषयीची माहिती 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'च्या वेळी स्पष्ट झाली. त्यानुसार ती देण्यात आली. लस खरेदीविषयीची माहिती मिळाली नसल्याचे श्री. कांबळे यांनी म्हटले आहे. परंतु ही मागणी मूळ अर्जात नव्हती. संबंधित अभिलेख त्यांना अवलोकनासाठी दिल्यानंतर वेगळ्या पत्रांद्वारे त्यांनी औषधे व लस खरेदीच्या बिलांच्या प्रतींची मागणी दि.१४.११.२००८ रोजी केली व या १९६ पानांच्या छायांकित प्रती त्याच दिवशी त्यांना देण्यात आल्या. मूळ अर्जानुसार मागितलेली माहिती विहित मुदतीत देण्यात आली. प्रथम अपिलात मागितलेली अतिरिक्त माहितीही लगेच देण्यात आली. डॉ.सुरवशी यांच्या शैक्षणिक पात्रतेविषयी माहिती ते रजेवर असल्यामुळे व त्यांच्या बदलीमुळे देता आली नव्हती, ती नंतर देण्यात आली, असे प्रतिपादन तत्कालीन जन माहिती अधिकारी डॉ. सुनिल आम्बोले व विद्यमान जन

माहिती अधिकारी डॉ. राम हंकारे व अपिलीय प्राधिकारी श्री. वाय. बी. माळी यांनी पूरक कागदपत्रांसह केले.

उभय बाजूंनी केलेली निवेदन व त्यांनी सादर केलेली कागदपत्रे पाहता श्री. काबंळे यांना माहिती देण्यात आली आहे. त्या संदर्भातील जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचे निवेदन योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२९.१०.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. सुधाकर विनायक जोशी — अपीलकर्ता
द्वारा श्री. जी.एन. पिंगळे, त्रिमूर्ती कॉलनी,
संत तुकाराम नगर, आळंदी रोड,
वॉटर टँक जवळ, भोसरी, पुणे-३९

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अध्यक्ष,
मातृमंदिर विश्वस्त संस्था, प्राधिकरण, निगडी, पुणे-४४ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव,
मातृमंदिर विश्वस्त संस्था, प्राधिकरण, निगडी, पुणे-४४

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६४७ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २६.११.२००८ |
| ३. | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** - श्री. सुधाकर विनायक जोशी<br>द्वारा श्री. जी.एन. पिंगळे, त्रिमूर्ती कॉलनी,<br>संत तुकाराम नगर, आळंदी रोड,<br>वॉटर टँक जवळ, भोसरी, पुणे-३९<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा सचिव,<br>मातृमंदिर विश्वस्त संस्था, प्राधिकरण, निगडी, पुणे-४४<br>श्री. वा. ना. अभ्यंकर | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १५.११.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २.१.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र -अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. ११.६.२००८ व दि. १२.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश करण्यात आला होता. त्यावेळी जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी उपस्थित नसल्याने दि. २६.११.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली.

मातृमंदिर विश्वस्त संस्था, निगडी, पुणे येथील वाहनचालकाच्या संदर्भात मागितलेल्या माहिती मागण्यासाठी केलेल्या कोणत्याही अर्जाची व पत्रव्यवहाराची दखल संस्थेचे अध्यक्ष व कार्यवाह घेत नाहीत. संबंधित वाहनचालक आपल्या अंगावर गाडी घालतात व ठार मारण्याचा प्रयत्न करतात. हा आपल्या जीवन-मरणाचा प्रश्न असून अर्जांची दखल घेतली पाहिजे, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. सुधाकर विनायक जोशी यांनी केले.

वाहनचालकाबरोबरच संस्थेचे कार्यवाह श्री. वा.ना.अभ्यंकर यांच्याबाबतची व अन्य विविध स्वरुपाची माहिती मागणारा पत्रव्यवहार श्री. सुधाकर विनायक जोशी करीत आले आहेत. अनेक प्रकारचे आरोप त्यात त्यांनी केले आहेत, असे त्यांनी सादर केलेल्या कागदपत्रांवरून दिसते.

श्री. जोशी यांचा अर्ज मिळाला नसल्यामुळे उत्तर दिलेले नाही. मात्र कोणतीही माहिती दडविण्याचा संस्थेचा उदेश नाही, असे प्रतिपादन संस्थेचे जन माहिती अधिकारी तथा कार्यवाह, मातृमंदिर विश्वस्त संस्था, निगडी, पुणे श्री. वा.ना.अभ्यंकर यांनी केले.

वाहनचालकाबाबतची माहिती अपीलकर्त्यास त्वरित द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार श्री. जोशी यांना दि. २६.११.२००८ रोजी माहिती दिल्याची प्रत जन माहिती अधिकारी तथा कार्यवाह, मातृमंदिर विश्वस्त संस्था, निगडी, पुणे श्री. वा.ना.अभ्यंकर यांनी आयोगाला सादर केली. श्री. जोशी यांच्या आरोपांची व तक्रारीची दखल घेणे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२९.१०.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११ ००१

श्री. मुरलीधर दत्तात्रय वारुंजीकर
५०६/९, प्लॉट नं.३, सदर बझार,
एस. टी. स्टँड. मागे, सातारा

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपसंचालक,
नगररचना, पुणे विभाग, पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा सहायक संचालक,
नगर रचना, सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६५ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२२.०८.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. मुरलीधर दत्तात्रय वारुंजीकर
५०६/९, प्लॉट नं.३, सदर बझार,
एस. टी. स्टँड. मागे, सातारा

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपसंचालक,
नगररचना, पुणे विभाग, पुणे — श्रीमती साधना प्र.नाईक

**जन माहिती अधिकारी** तथा सहायक संचालक,
नगर रचना, सातारा — श्री. सुनिल पु.मरळे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२०.११.२००६ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२६.१२.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२७.१२.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१९.०१.२००७ |

| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती -**<br>प्रॉपर्टी कार्डावर कब्जेदार सदरात नावे नसताना १२(२) नोटिशीने नुसत्या ॲफीडेव्हिट इ. ने नावे लिहिली जातात याचा नियम/GR/कोर्ट निवाडा याच्या छायाप्रती |
|---|---|

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२२.०८.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी घेण्यात आली.

मिळकत पत्रावरील कब्जेदार सदरात नावे नसताना नावे नोंदविल्या जाण्याच्या संदर्भात आपण मागितलेल्या माहितीपेक्षा जन माहिती अधिकारी तथा सहायक संचालक,नगर रचना, सातारा यांनी वेगळी माहिती दिली. चुकीची व अपूर्ण माहिती दिलेली असताना जन माहिती अधिकारी तथा सहायक संचालक,नगर रचना, सातारा यांचा निर्णय योग्य ठरवून अपिलीय प्राधिकारी तथा उपसंचालक, नगररचना, पुणे विभाग, पुणे यांनी अपील नाकारले, म्हणून अपीलकर्ता श्री.मुरलीधर दत्तात्रय वारुंजीकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री.वारुंजीकर यांना संबंधित माहितीच्या छायाप्रती देण्यात आलेल्या आहेत. मालकीहक्काबाबतच्या वादातून निर्माण झालेला हा विषय आहे. अन्य व्यक्तींचे नाव पुराव्याशिवाय दाखल केले, उच्च न्यायालयाच्या आदेशातील मुदतीप्रमाणे भूसंपादन केले नसल्यामुळे न्यायालयाचा अवमान झाला आहे, आपण वारंवार तक्रार करुनही नाव नोंदणीतील चुक दुरुस्ती केलेली नाही, असे लेखी व तोंडी प्रतिपादन श्री.वारुंजीकर यांनी केले.

श्री.वारुंजीकर यांनी घेतलेल्या हरकतीनंतर दखल घेऊन नोटीस काढण्यात आली. भूसंपादन कायद्यानुसार दावे दाखल केल्याबाबतची सर्व माहिती देण्यात आली आहे. मालकी हक्क ठरविण्यासाठी व नुकसान भरपाई रक्कम वाटपासाठी संबंधित प्रकरण जिल्हा न्यायालयाकडे वर्ग करण्यात आले असून सध्या प्रकरण न्यायप्रविष्ट आहे, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा सहायक संचालक,नगर रचना, सातारा श्री. मधुकर य. देवडे यांनी पूरक कागदपत्रांसह केले.

श्री.वारुंजीकर यांनी उपस्थित केलेले मुद्दे मालकी हक्काच्या संदर्भातील आहेत. तसेच खुलासा, अभिप्राय यांची मागणी त्यांनी केली आहे. माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ अंतर्गत अशी विचारणा करता येत नाही. देय माहिती त्यांना देण्यात आली आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

पुणे
दि. : २३-१०-२००९